# ❖स्वच्छता अभियान मनरेगाशी जोडणार




**मनरेगाशी स्वच्छ भारत अभियान जोडण्याचा विचार केंद्र सरकार करीत असून ग्रामीण भागात मनरेगाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होत असल्यामुळे यातून मनुष्यबळ मिळेल आणि आपोआपच योजनेची व्याप्ती वाढण्यास मदत होईल, असे केंद्र सरकारला वाटते. भारत शौचालयाच्या लक्ष्यापासून अजूनही कोसोदूर असल्याची माहिती एनएसएसओने नुकत्याच केलेल्या अभ्यासातून मिळाली आहे. त्यामुळे केंद्र सरकार हे अभियान मनरेगाशी जोडण्याच्या प्रयत्नांत आहे. या प्रकरणी पुढील सुनावणी २० फेब्रुवारी रोजी होणार आहे.मनरेगाच्या मजुरांचा वापर कचरा प्रबंधन सयंत्रात काम करणे आणि घरातून कचरा गोळा करण्यासाठी करण्याचा प्रस्ताव केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाने ठेवला आहे. त्या प्रस्तावावर सध्या केंद्र सरकार विचार करीत आहे. यासाठी सर्वच राज्यांनी मदत करण्याचा आग्रहही धरला जात आहे. ग्रामीण विकास सचिव जुगलकिशोर महापात्रा यांनी स्वच्छ भारत अभियानाच्या कामासाठी सर्वप्रथम ज्या ५०० गावांत मनरेगाच्या मजुरांवर कामाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे, त्या गावांत हा प्रयोग करून पाहण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.स्वच्छ भारत अभियानात मनरेगाच्या मजुरांना संधी देणे आणि त्या अंतर्गत निधी प्राप्त करून घेणे हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ड्रीम प्रोजेक्ट आहे. याबरोबरच सध्या अधिकारी तामिळनाडूमधील स्वच्छता योजनेचा अभ्यास करीत आहेत. तामिळनाडूत कचरा घरातून जमा करणे, तो बाजूला करणे, कंपोस्ट करणे आणि सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट प्लँटस्पर्यंत पाठविण्याचे काम मनरेगाचे मजूर करतात. त्याचा सध्या अभ्यास सुरू आहे.इंदिरा आवास योजनेअंतर्गत उभारण्यात आलेल्या घरांमध्ये किमान २७ लाख शौचालये उभारण्यात येणार आहेत. यासाठी मनरेगाच्या मजुरांची मदत घेतली जाणार आहे. सध्या मनरेगाच्या माध्यमातून ठोस कचरा प्रबंधन आणि कचरा गोळा करण्यासंबंधी निधी देण्याबाबत विचार केला जात आहे. अलिकडेच महापात्रा यांच्याकडे स्वच्छ भारत अभियानाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यामुळे ग्रामीण विकास आणि पेयजल तथा स्वच्छता मंत्रालयात समन्वय शक्य होत आहे. दरम्यान, आंध्र प्रदेश, तेलंगणात स्वच्छता अभियान मनरेगासोबत जोडण्यात आले आहे. केंद्र सरकार पश्चिम बंगालमधीलही काही योजनांचा अभ्यास करीत आहे.**